सहकार विभागातील लेखा व अर्थसंकल्पाच्या कामासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या १६ अस्थायी पदांना दि.१/३/२०२५ ते दि.३१/८/२०२५ पर्यत मुदतवाढ देण्याबाबत.........

महाराष्ट्र शासन,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. अपमु-०२२५/प्र.क्र.३३३/५ स
मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ मार्च, २०२५

वाचा :- १) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.राजस-१००८/प्र.क्र.५३८/५स, दि.५/५/२०११

२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. राजस-०९२४/प्र.क्र.२१०/५ स, दि.३०/९/२०२४

३) सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे पत्र क्र. कक्ष-१/आस्था/लेखा व अर्थसंकल्प/१७२/२०२५, दि.२२/०१/२०२५

४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३/३/२०२५

प्रस्तावना :-

सहकार विभागातील लेखा व अर्थसंकल्पाच्या कामासाठी आवश्यक असलेली १६ अस्थायी पदे दि.३१/८/२०२५ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भ क्र.२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव सदरची पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक असून त्यांना सन २०२५-२०२६ मध्ये मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. सबब, सहकार विभागातील लेखा व अर्थसंकल्पाच्या कामासाठी आवश्यक असलेली १६ अस्थायी पदे दि.१/३/२०२५ ते दि.३१/८/२०२५ पर्यत पुढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सहकार विभागातील लेखा व अर्थसंकल्पाच्या कामासाठी आवश्यक असलेली खाली नमुद केलेली १६ अस्थायी पदे दि.१/३/२०२५ ते दि.३१/८/२०२५ पर्यत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

पदनाम	पदांची संख्या
मुख्य लिपिक	१६

२. उपरोक्त अस्थायी पदांची जिल्हावार विगतवारी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे स्वतंत्रपणे प्रसृत करतील.

३. यावर होणारा खर्च "२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन (०१) (०५) विभागीय व जिल्हा प्रशासन (दत्तमत २४२५००६७)" या लेखाशिर्षाखाली दाखवावा व त्याखालील सन २०२५-२०२६ च्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, दि.३/३/२०२५ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्या संगणक सांकेतांक २०२५०३१७१२१७१८१६०२ असा आहे व डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,

PRAVIN RAJARAM MUNDHE

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=f2250646a3997378536c4aaa7d636fcdb30a0b8f8913330badb8710a501fc1c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DC78036626EC580D66C0AC502D43AF5F670B5BA13F51213AD071ACD53714A284, cn=PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2025.03.17 12:18:04 +05'30'

(प्रविण मुंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन),
३. सर्व संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, द्वारा-सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. उपकोषागार अधिकारी, वाशी, नवी मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ जळगांव/ पुणे/ सातारा/ परभणी/ बीड/ बुलढाणा/अकोला/ अमरावती/वर्धा/जालना/नागपूर.
१०. वित्त विभाग, (व्यय-२/अर्थसंकल्प-१९/ वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती- कार्यासन ५स.